संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# कुंपणानेच शेत खाल्यानंतर ....

**देशातील** सर्वात मोठी गुन्हा अन्वेषण संस्था दोन अधिकाऱ्यांच्या हेव्यादाव्यामुळे भरडली जावी किंवा तिची अप्रतिष्ठा व्हावी हे अत्यंत दुर्दैवी ठरते. सीबीआयच्या महासंचालकपदी असलेले आलोक वर्मा यांच्यावर सीबीआयचे संचालक राकेश आस्थाना यांनी आरोप केले होते तर वर्मा यांनी आस्थाना यांच्यावर भ्रष्टाचाराच्या आरोपावरून थेट गुन्हाच दाखल केला होता. दोघांनी एकमेकांवर केलेले आरोप गंभीर स्वरुपाचे होते. त्यातही वर्मा यांच्यावर काही कोटी रुपयांची लाच घेतल्याचा थेट आरोप झाला. आणि मग त्या दोघांच्या वादामध्ये त्या प्रमुख गुन्हा अन्वेषण संस्थेची आणखी बेअब्रू होऊ नये म्हणून आलोक वर्मा यांना महासंचालकपदावरून हटवण्यात आले. त्यांनी न्यायालयात धाव घेतली. आणि न्यायालयाने त्यांची पुनर्नियुक्ती केली परंतु दरम्यानच्या काळात वर्मा यांच्यावर झालेल्या आरोपांची चौकशी करण्याकरीता थेट पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्य समिती स्थापन झाली त्यात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते यांचा समावेश होता. दक्षता आयोगानेदेखील वर्मा यांच्यावरील आरोपांची चौकशी केली आणि त्यात काही प्रमाणात तथ्य असल्याचे आढळून आले. अशी व्यक्ती संस्थेच्या प्रमुखपदी राहाणे योग्य नाही असा निष्कर्श काढून समितीने वर्मा यांना हटवण्याची शिफारस केली. त्यांची अग्नीशमन दलाच्या महासंचालकपदी बदली केली गेली. हे सगळे नाटक दिल्लीत घडत असताना अनेक प्रकारच्या चर्चांना ऊत आला होता. कारण आलोक वर्मा यांच्या सेवानिवृत्तीला केवळ वीस दिवस बाकी असताना त्यांना इतक्या तातडीने त्या पदावरून हटवण्याचे प्रयोजन काय असे प्रश्न उपस्थित झाले. काँग्रेसने तर नेहमीप्रमाणे या प्रकरणाशी राफेलचा मुद्दा जोडला आणि त्यासंदर्भात वर्मा यांच्याकडून एफआयआर दाखल होण्याची शक्यता असल्यानेच त्यांना या पदावरून तातडीने हटवले गेले असा सूर लावला गेला. परंतु राफेल प्रकरणाची चौकशी करण्याचे सीबीआयला सांगितले गेले नसल्याने त्याचा एफआयआर दाखल करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. वर्मा यांना त्या पदावरून हलवण्यापूर्वी त्यांची बाजू ऐकून घेतली गेली नाही. म्हणजे त्यांच्यावर अन्याय झाला किंवा त्यांना योग्य संधी दिली गेली नाही. असादेखील युक्तीवाद केला गेला. परंतु त्यांना निलंबित किंवा बडतर्फ केले गेले नसल्याने संधी देण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

### अधिकाऱ्यांच्या वेठीला यंत्रणा

हा सगळा घटनाक्रम काही दिवसात इतक्या वेगाने घडला की सीबीआयसारख्या महत्वपूर्ण संस्थेसंबंधी फार काळ गोंधळाचे वातावरण ठेवणे सरकारला किंवा देशाला परवडणारे नव्हते. ज्याअर्थी पंतप्रधानांनी त्यात लक्ष घातले. त्याअर्थी प्रकरण मुळातच गंभीर होते. कोणा एका व्यक्तीसाठी संपूर्ण यंत्राला वेठीला धरले जाणे योग्य नव्हतेच. हा वाद ज्यावेळेला उफाळला त्याचवेळेला सीबीआय म्हणजेच गुन्हा अन्वेषण विभागाच्या कार्यपध्दतीमध्ये किती मोठे दोष आहेत. किंवा संपूर्ण देशावर आपला धाक निर्माण करणारी ही यंत्रणा काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मर्जीप्रमाणेसुध्दा काम करू शकते. किंवा त्यात मनमानी होऊ शकते. ते यानिमित्ताने अतिशय ठळकपणे समोर आले. जगात सर्व प्रमुख देशांमध्ये अशी एक मध्यवर्ती तपासयंत्रणा कार्यरत असते. जे गुन्हे राज्यपातळीवरील तपास यंत्रणांना हाताळता येत नाही किंवा असे काही गुन्हे असतात की ज्याची व्याप्ती प्रचंड मोठी असते. ज्यात काही लाख कोटींच्या भ्रष्टाचारापासून ते अनेकांच्या हत्याकांडापर्यंत अनेक प्रकरणांचा समावेश होऊ शकतो. अशा गुन्ह्यांना लगाम बसावा किंवा त्यातले खरे आरोपी शोधून काढले जावेत याकरीता सीबीआयला विशेष अधिकारही दिलेले असतात. या यंत्रणेचा किती सक्षमपणे वापर होतो हा खरे तर तितक्याच मोठ्या तपासाचाही विषय ठरतो. कारण गेल्या चाळीस पन्नास वर्षांपासून सीबीआय म्हणजे केंद्र सरकारच्या हातातील पोपट असल्याची प्रतिमा निर्माण झाली. राजकीय दबाव किंवा सत्ताधारी लोक आपले राजकीय हितसंबंध साधण्यासाठी किंवा राजकीय सूड उगवण्यासाठी या यंत्रणेचा वापर करतात. असाही आरोप अनेक वेळेला झाला आहे. जर एवढ्या मोठ्या या यंत्रणेवर सत्ताधारी पक्षाचा किंवा एकूण राजकारणाचा प्रभाव राहात असेल तर त्याचा तितकाच मोठा गैरफायदा या यंत्रणेत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी घेतला तर तो त्यांचा दोष ठरू शकत नाही वर्मा किंवा आस्थाना यांच्यातील वैमनस्य हे सीबीआयमधल्या राजकीय हस्तक्षेपाचेच दुष्परिणाम आहेत असा स्पष्ट निष्कर्षही काढता येतो.

### पुनर्रचनेची गरज

या सगळ्या पार्श्वभूमीवर तडकाफडकी बदली झालेल्या आलोक वर्मा यांनी नवीन नियुक्ती स्वीकारलेली नाही जिथे आपली नव्याने नियुक्ती केली गेली त्या पदासाठी आवश्यक असलेली वयोमर्यादा आपण ओलांडली आहे. परिणामी माझी सेवानिवृत्ती गृहित धरावी असे सांगून त्यांनी राजीनामा देणेच पसंत केले आहे. परंतु वर्मा यांची हाकालपट्टी झाल्यानंतर एकूणच या यंत्रणेच्या कार्यपध्दतीविषयी पुनर्विचार करण्याची वेळ आलेली दिसून येते. कारण या सगळ्या यंत्रणेचा सूत्रधार तिचा महासंचालक असतो. त्याने पारदर्शकपणे काम करावे असे अपेक्षित असेल तर राजकीय हस्तक्षेप थांबवावा लागेल. परंतु अधिकाऱ्यांच्या मर्जीवर संपूर्ण यंत्रणा सोडूनही देता येणार नाही. थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोट्यवधीची लाच घेतल्याचा आरोप होणे ही काही सामान्य गोष्ट ठरत नाही. या पार्श्वभूमीवर याच यंत्रणेतले छोटे अधिकारी किंवा कर्मचारी काय धुडगूस घालत असतील याची सहज कल्पना येते. केवळ हे गंभीर आरोप झाल्यानंतर पंतप्रधानांना त्यात लक्ष घालावे लागले. परंतु या यंत्रणेची कार्यक्षमता आणि पारदर्शकता टिकवण्याकरीता तितक्याच मोठ्या उपाययोजनांची किंवा खबरदारीची आवश्यकता भासते. गुन्हे शोधणारे गुन्हेगार ठरू लागले तर कुंपणाने शेत खाल्ल्याचा हा प्रकार ठरतो. आता कुंपणही आणि शेतही या दोघांचे नुकसान झालेले आहे. भविष्यकाळात सीबीआयची पडझड थांबवायची असेल तर खूप मोठ्या दुरुस्तीची आवश्यकता आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे यासंदर्भात किंवा सीबीआयच्या उणिवा किंवा दोष दूर करण्याकरीता एकाही लोकप्रतिनिधीने अभ्यासपूर्ण सूचना केलेल्या नाहीत किंवा मागणीही केलेली नाही.